आरोग्यशाला समितीचे को-चेअरमन वैद्य अभय कुलकर्णी तसेच नगरसेविका सौ.बिरारी आणि मा.आमदार श्री.नितीन भोसले उपस्थित होते. या शिबिराचा फायदा ११५ रुग्णांनी घेतला. शतायुषी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा.पांडे आणि इतर कार्यकर्त्यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. वैद्य एकनाथ कुलकर्णी, वैद्य राजन कुलकर्णी, वैद्य सुरेश गीते वैद्य संतोष पाठक, वैद्य किर्ती काटे, वैद्य गीतांजली वैद्य, वैद्य नीलांबरी शुक्ल, वैद्य पुष्पा इंगळे, वैद्य स्नेहल कुमार पाटील, वैद्य सोनल मांडे, वैद्य योगेश सोनवणे आदींनी रुग्ण तपासणी व चिकित्सेचे कार्य केले.

## मुंबई वैद्य सभेतर्फे स्वर्गीय वैद्य नानासाहेब पुराणिक स्मृति व्याख्यान संपन्न

मुंबई येथील रविंद्र नाटय मंदिरातील पु.ल.देशपांडे सभागृहात २९ ऑगस्ट २०१० रोजी मुंबई वैद्यसभेतर्फे स्व.वैद्य नानासाहेब पुराणिक स्मृति व्याख्यान आयोजित केले होते. प्रमुख वक्ते सेंट्रल कौन्सील ऑफ रिसर्च इन आयुर्वेद अँड सिध्दचे महासंचालक वैद्य रमेशबाबू देवल्ला होते. त्यांनी आपल्या व्याख्यानात आयुर्वेदीय संशोधन कार्याची व विभागाची अद्यावत माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अशोक बी.वैद्य होते. वैद्य भि.के.पाध्ये गुर्जर यांनी सर्वांचे स्वागत केले. श्री.रणजित पुराणिक यांनी आभार मानले. वैद्य दीनानाथ उपाध्याय यांनी प्रास्तविक केले. कार्यक्रमास मुंबईतील वैद्य, विद्यार्थी, अध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते.

## आयुर्वेद व्यासपीठ, नवी मुंबई शाखेतर्फे एकदिवसीय आयुर्वेद परिसंवाद संपन्न

आयुर्वेद व्यासपीठाच्या नवी मुंबई शाखेतर्फे रविवार दि.२६/९/१० रोजी स्थूलता या विषयावर एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन केमिस्ट भवन, सानपाडा, नवी मुंबई येथे आयोजित केले होते. या परिसंवादात खालील मान्यवरांची व्याख्याने संपन्न झाली. वैद्य मुकूंद सबनीस (स्थूलता - नैदानिक दृष्टीकोन) वैद्य आशुतोष यार्दी (स्थूलता व मानसविचार) वैद्य स्वाती इनामदार (स्थौल्यातील पंचकर्मे), वैद्य सुचित्रा कुलकर्णी (स्थौल्य - सैध्दांतिक दृष्टीकोन), वैद्य कौस्तुभ गद्रे (स्थौल्य व आहार) वैद्य र.वि.भंडारी (स्थौल्यातील योगोपचार) यासंबंधी व्याख्याने झाली. वैद्य विनय वेलणकर, वैद्य विजय कुलकर्णी, वैद्य प्रकाश ताथेड, वैद्य देवदत्त भादलीकर, वैद्य राजन पाटणकर आदी उद्घाटन समारंभास उपस्थित होते. सुमारे २०० वैद्य व विद्यार्थ्यांनी या परिसंवादाचा लाभ घेतला. वैद्य जिरापुरे, वैद्य मनोज जगताप, वैद्य अमित खंडागळे आदींनी परिसंवाद यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## वैद्य सुभाष रानडे यांना अनंतश्री पुरस्कार



पूज्य स्वामी वरदानंद भारती पूर्वाश्रमीचे श्री.अनंत दामोदर आठवले यांच्या स्मरणार्थ इंदिरा सेवा समिती गोरटे, जिल्हा नांदेड यांच्या वतीने यावर्षीचा अनंतश्री पुरस्कार आयुर्वेदाचे संरक्षण आणि संवर्धनाचे उत्कृष्ट कार्य करणा-या पुण्याच्या वैद्य सुभाष रानडे यांना ५ सप्टेंबर २०१० रोजी श्रीदासगणु महाराज प्रतिष्ठान, गोरटे, जि.नांदेड येथे श्री.संजय देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. २१ सहस्त्र रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. या प्रसंगी, परदेशात आयुर्वेद शास्त्राच्या प्रचार-प्रसाराचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल वैद्या सौ.सुनंदा रानडे यांचाही सत्कार करण्यात आला.

## आगामी कार्यक्रम

**International Seminar on Preventive Cardiology.**

**Date** - 2nd January 2011.

**Venue** - Dhanvantari Auditorium, Siddhakala Ayurved Mahavidyala, Sangamner, Dist - Ahmednagar - 422 605.

**Time** - 9 am to 5.30 pm

**Enrolment fees** - Rs. 300/-

**Organizers** - 1) International Academy of Ayurved, Pune 2) B.A.M.S. Graduate Association - India 3) Siddhakala Ayurved Mahavidyala, Sangamner

**Contact** - Dr.Suhas Joshi - 982234693.
Dr.Kishor Saraf - 9822322021
Dr.Mukund Erande - 9422515680

त्यामध्ये मिश्रणाचे सहापट गंधक घालावे व ते पातळ झाले की त्यात पुरचुड्या सोडाव्यात व तळून घ्याव्यात. साधारणत: ३ तास तळण सुरु ठेवावे. स्वांगशीत झाल्यावर त्यावरील गंधक व कपडा सुरीने खरवडून काढावे. आतील **पांढरी मात्रा** काढून घ्यावी.

३) औषधी कल्क व कुमारी स्वरस मध्ये खल केलेल्या मिश्रणाच्या सुपारीसारख्या गोळ्या कराव्यात. त्या सावलीमध्ये सुकवाव्या. त्यांना रेशमी कापड गुंडाळून घट्ट दोऱ्याने बांधाव्यात. एका मातीच्या परळामध्ये थोडे तूप व बराचसा गंधक घेऊन त्यामध्ये गोळ्या ठेवाव्यात. परळावर दुसरे एक झाकण ठेवावे, ज्याला मध्यभागी छिद्र असावे, संपुटास छिद्र सोडून संधीलेप करावा. संपुट वालुकायंत्रात ठेऊन वालुकायंत्रास मंदाग्नी द्यावा. छिद्रातून सळईने चाळवून गंधक पातळ झाला किंवा नाही हे पाहत रहावे, मात्रा ही हलवत ठेवाव्यात. एक तासापर्यंत असे पाचन करावे. नंतर स्वांगशीत झाल्यावर मात्रा काढून घ्याव्यात.

४) औषधी मिश्रण हे रुईच्या चिकात एक दिवस खल करुन त्याच्या एक तोळा वजनाच्या वर्तीका करुन उन्हात वाळवाव्यात. त्या घट्ट वस्त्रात गुंडाळून दोऱ्याने बांधाव्यात. लोहसंपुटात मिश्रणाच्या दुप्पट गंधक घालून त्यामध्ये पोट्टल्या ठेवाव्यात. संपुटास संधीलेप करुन ते जमिनीत पुरावे तयावर पाच रान शेण्यांचा अग्नी द्यावा. स्वांगशीत झाल्यावर मात्रा काढून घ्याव्यात. अशी सात पुटे द्यावीत **लाल वर्णाच्या मात्रा** तयार होतात.

पोट्टली रासायनाच्या बऱ्याच निर्माण पद्धती आहेत. काही निवडक पद्धतींचा उल्लेख इथे केलेला आहे. यापेक्षाही वेगळ्या पद्धती प्रचलित आहेत. आपल्याकडे उपलब्ध असणारी साधन सामुग्रीनुसार पद्धत निवडावी. आयुर्वेदिक अनुसाधन केंद्रामध्ये अशा पद्धतीने तयार केलेल्या पोट्टलीचा रुग्णालयीन अभ्यास करुन त्याचे मानकीकरण करावे.

## ✲ आवाहन ✲

राष्ट्रीय शिक्षण मंडळ संचालित आयुर्विद्या मासिकाचा डिसेंबर २०१० चा अंक हा आहार संकल्पनेवर आधारित **''खा, प्या आणि सुखी राहा !''** असा विशेषांक असणार आहे. सामान्य वाचकांना, विद्यार्थ्यांना व वैद्यकीय व्यावसायिकांना उपयुक्त, माहितीपूर्ण अशा विविधांगी लेखांचा त्यात समावेश असेल जसे - • प्रकृतीनुसार आहार • गर्भिणी/सूतिका अवस्था विशेष आहार • बालकांचा आहार • रोगानुसार आहार योजना - उदा. मधुमेहींसाठी विशेष आहार व्यवस्था • पथ्यकल्पना निर्माण • आहारीय वर्गातील द्रव्ये व त्यांचे गुणकर्म • आहारीय द्रव्यांतील भेसळ व त्यांवरील उपाययोजना • अर्वाचीन भोजन व्यवस्था • पानार्थ आयुर्वेदीय कल्पना • स्वास्थ्यकर आहार.

तरी इच्छुकांनी आपले अनुभवजन्य व शास्त्रीय लेख **''संपादक''**, आयुर्विद्या मासिक, ५८३/२, रास्ता पेठ, पुणे - ४११ ०११ किंवा ayurvidyamasik@gmail.com या पत्त्यावर ३१ ऑक्टोबर २०१० पूर्वी पाठवावेत ही विनंती. सहकार्याबद्दल धन्यवाद !

**- डॉ. दि. प्र. पुराणिक, अध्यक्ष व संपादक**

## ✲ अभिनंदन ✲



पूज्य स्वामी वरदानंद भारती, पूर्वाश्रमीचे **श्री. अनंत दामोदर आठवले** यांच्या स्मरणार्थ **''इंदिरा सेवा समिती''** गोरटे, जिल्हा नांदेड, यांच्या वतीने दिला जाणारा या वर्षीचा **''अनंतश्री''** पुरस्कार आयुर्वेदाचे संरक्षण आणि संवर्धनाचे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पुण्याच्या **वैद्य सुभाष रानडे** यांना ५ सप्टेंबर २०१० रोजी श्रीदासगणु महाराज प्रतिष्ठान, गोरटे, जि. नांदेड येथे श्री. संजय देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. २१ सहस्त्र रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. वैद्य सुभाष रानडे यांनी आयुर्वेद शास्त्राचा प्रचार, प्रसार करुन युरोप, अमेरिकेसह जगातील ६६ देशांत आयुर्वेद शास्त्राचे महत्व पटवून दिले आहे. पुरस्कार समारंभाच्या प्रसंगी, परदेशात आयुर्वेद शास्त्राच्या प्रचार-प्रसाराचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल **वैद्या सौ. सुनंदा रानडे** यांचाही सत्कार करण्यात आला.